अफी आणि जादुई ड्रम

बेनिनच्या कथा





अफी आणि जादुई ड्रम

बेनिनच्या कथा


थेक्ला मिडिओहुआन, चित्रात: हेक्टर

मराठी: अश्विनी बर्वे






एके दिवशी अफीच्या देशात युद्ध सुरू झाले. राहण्यासाठी सुरक्षित जागेच्या शोधात ती आणि तिचे आई-वडील गाव सोडून पळून गेले. गर्दीत आफी हरवली. तिला तिचे आई-वडील सापडत नव्हते. "ते कुठे आहेत? त्यांनी कोणता रस्ता निवडला आहे?" तिने स्वतःला विचारले. अफी एकटी होती. ती रडू लागली. ती दिवस-रात्र रडत राहिली. तिचे डोळे अश्रूंनी इतके भरले होते की तिला आता काही दिसत नव्हते.




अफी बराच वेळ एकटीच चालत राहिली. अखेरीस ती इतकी दमली की रस्त्याच्या कडेला आडवी झाली आणि गाढ झोपी गेली. जंगलातील घुबडासारखी ती झोपली.




अफी जागी झाली. तेव्हा तिला एक आजोबा हलवत होते. "उठ, बाळा," ते म्हणाले. "एवढी छोटी मुलगी इथे एकटी काय करत आहे? तिला भूक लागली असेल. ए! बाळा, उठ आणि माझ्यासोबत ये."




अफी त्या आजोबांसोबत निघाली. "काय नशीब, बोलायला कोणीतरी मिळालं!" अफीने विचार केला. “ते थोडेसे म्हातारे आणि थोडासे अस्वच्छ असला तरी काही फरक पडत नाही."




शेवटी ते एका जुन्या
पडक्या झोपडीपाशी पोहोचले.
तिथेच ते आजोबा राहत होते.



अफीला आजोबांच्या झोपडीत
काम करायला आवडत असे.





अफीला त्या आजोबांना मदत करतांना आनंद होते असे. तिने थोडे धान्य दळले आणि जेवण बनवले. तिने पाण्याचे भांडे आणि मोठी घागरी भरण्यासाठी नदीतून पाणी आणले. तिने झोपडी झाडली आणि भांडी घासली.



एके दिवशी, तो म्हातारे आजोबा आजारी पडले. त्यांना माहित होते की ते लवकरच मरणार आहेत. त्यांनी अ फीला बोलावून म्हटले, "मी दूरवर जाण्यापूर्वी तुला एक भेटवस्तू देऊ इच्छितो. हा छोटा ढोल घे. जेव्हा जेव्हा तू चौकात पोहोचशील, तेव्हा त्यावर तीनदा थाप मार."


अफीला खूप दुःख झाले. तिने आपला मित्र मैत्रीण गमावला होता. आता तिचं काय होणार होतं?ती त्या झोपडीतून बाहेर पडली. ती खूप वेळ चालत राहिली, अखेर एका चौकात येऊन पोहोचली. आजोबांनी तिला काय सांगितले होते ते तिला आठवले आणि तिने तीनदा ढोल वाजवला :ढम ढम ढम





तो एक जादुई ड्रम होता! अफीला स्वतःचे जुने गाव सापडलं! आता झाड पुरेशी उंच झाली होती, पुन्हा झोपड्या बांधल्या गेल्या होत्या. आणि तिथेच तिचे आईबाबा होते. तिने त्यांना बघितले आणि धावत ती त्यांच्याकडे गेली.

ती त्यांच्या कडेवर जाऊन बसली. .



अफू आणि जादुई ड्रम

युद्धामुळे नेहमी लोकांना त्यांचे घरदार सोडून जावे लागते. अशा परिस्थितीत लहान मुले नेहमी हरवतात. सुदैवाने अफीला आजोबा भेटले आणि जादुई ड्रम मिळाला!